# भोई जमातीतील महिला सशक्तीकरणासाठी शासकीय योजना

सुनिता जगन्नाथराव कुकडे
के.के.एम. महाविद्यालय, मानवत
जि.परभणी

डॉ.रामचंद्र मुंजाजी भिसे
दिगंबरराव बिंदू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
भोकर जि.नांदेड

प्रस्तावना

आर्टिकल 38 मध्ये विषमता नष्ट करणे, सर्वांना समान संधी देणे, वेगवेगळ्या पातळीवर जो समाज आहे त्या घटकांना एकत्र एका ठिकाणी आणणे या जबाबदाऱ्या शासनावर सोपविलेल्या आहेत. राज्यघटना लोकशाहीला महत्त्व देते, समान वागणूक, समान समता, समान संधी, समान शिक्षण, समान वेतन, लोकांची क्षमता समान असावयास हवी. भटक्या भोई जमातीचा स्तर निकृष्ट मागासलेले असमान असतील तर समान संधीचे तत्व निरर्थक ठरेल. म्हणून घटनेत मार्गदर्शक तत्वानुसार महिलांना व मुलींना सक्तीच्या शिक्षणाचा आग्रह धरून परिवर्तन करून समता प्रदान करणारी ती एक शक्ती आहे. त्यावर महिला सबलीकरण आवलंबून आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर महिलांचे प्रश्न सुटले नाहीत. त्यातच भोई जमातीतील महिलांचे प्रश्न अद्यापही सुटलेले नाही. महाराष्ट्र शासनाने 1965 नंतर शासकीय सेवेत आरक्षण देऊन, समिती व शिफारस काढून सामाजिक विकास, भटक्या विमुक्तांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी भरीव व ठोस कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. त्यातल्या त्यात महिलांच्या आर्थिक व एकूणच विकास करणे म्हणजे महिला सबलीकरण होय. महिलांचा विकास म्हणजे कुटुंबाचा विकास होय. महिलांमधील आंतरिक भिती काढून आत्मविश्वास, स्वावलंबी, आत्मनिर्भरता या क्षमता मिळवणे आवश्यक आहे. तर ती निर्भय होऊन "हिंदू कोड बील" हे सुरक्षीत बील म्हणून त्याची अंमलबजावणी होईल. महिला सशक्तीकरण संकल्पना सर्वप्रथम 1960 मध्ये अमेरिकेतील काळ्या गटाने मांडली. 1985 मध्ये नौरोबी येथे आंतरराष्ट्रीय संमेलनातून स्त्री-पुरुष समतेचे तत्व सबलीकरणात आले. म्हणून 8 मार्च जागतिक महिला दिन म्हणून महिलांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी भारतात प्रयत्न झाले.

उद्देश :

भोई जमातीतील महिला सशक्तीकरणाच्या योजनेचा अभ्यास करणे.

व्याख्या (सशक्तीकरण)

किरण देवेंद्र यांच्या मते स्त्री सबलीकरण किंवा महिला सशक्तीकरण याचा अर्थ स्त्री ही आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र स्वयंनिर्भर व स्वावलंबी असणे होय. स्वतःबद्दल सकारात्मक दृष्टिकोन असावा जेणेकरून कोणत्याही विपरीत परिस्थितीला सामोरे जाता येईल विकास कार्यात सहभागी होण्यास पात्र ठरेल निर्णय निर्धारण प्रक्रियेत सहभागी होऊ शकेल या करिता शिक्षण सबलीकरणासाठी एक महत्त्वपूर्ण भूमिका वाटणारा घटक आहे.

ईरावती कर्वे यांनी मराठी लोकांची संस्कृती या पुस्तकात नमूद केल्याप्रमाणे यांचा सामाजिक दर्जा कनिष्ठ असला तरी ते कुठेही अस्पृश्य नाहीत. व त्यांनी वाहलेले पाणी संपूर्ण जातींना चालते यावरून समजते कि अलुतेदारापैकी 'भोई' या अलुतेदाराला शारीरिक कष्टाची कामे करावी लागत असे. त्याचा मोबदल्यात त्याला जी मजुरी दिली जाते त्यावर त्यांचा उदरनिर्वाह केला जाई. पण इतराबरोबर सामाजिक संबंधात सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात आला. भोई जातीचा व्यवसाय हा नद्या, तलावातून, मासेमारी करणे, लाईटची व्यवस्था नसल्यामुळे मशाली धरणे, शिंगाडे विकणे, टरबूज विकणे, भाजीपाला विकणे, शिकार करणे, मुरमुरे चणे फुटणे विकणे, विट भट्टी वर काम करणे, बीबे फोडणे, गोडंबी विकणे, मिठाई विकणे, मजुरी करणे ई व्यवसाय करत असत.

यातून भोई जमातीतील महिलांचे वेगवेगळ्या प्रकारचे व्यवसाय दिसून येतात. त्यांचे सामाजिक, शौक्षणिक, आर्थिक, राजकीय विकासाच्या दृष्टीने सशक्तीकरण होणे आवश्यक आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 1951 पासून वेगवेगळ्या योजना ग्रामीण लोकांपर्यंत पोहोचलेल्या नाहीत त्यामुळे त्याच्या लाभापासून ते वेगळे ठरले आहेत. 80 टक्के लोकांना वेगवेगळ्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. यामुळे त्यांची प्रगती होताना दिसून येत नाही. भारतामध्ये "खेडयाकडे चला ही मोहीम महात्मा गांधींनी राबवली होती.

खेडयाचा उद्धार जोपर्यंत होत नाही तोपर्यंत भारताची प्रगती होणार नाही. भारतीय ग्रामीण समाजाचा सर्वांगीण विकास घडवून आणायचं असेल तर आर्थिक नियोजन महत्त्वाचे आहे. त्या साठी या योजना राबवाव्या लागतील. या योजना राबवून व त्यांची अंमलबजावणी करणे खूप महत्त्वाचे आहे.

व्याख्या (योजना) :

भारतीय नियोजन मंडळाच्या मते, पंचवार्षिक योजनाच्या पद्धतीच्या सहाय्याने आर्थिक आणि सामाजिक जीवनामध्ये परिवर्तन घडवून आणाण्याचे प्रयत्नात सुरुवात झाली आहे ती पद्धती म्हणजे समाज विकास योजना होय.

पंडित नेहरू म्हणतात "भौतिक समृद्धी साधने एवढेच मर्यादित ध्येय समाज विकास योजनांची नाही. त्याहून श्रेष्ठ आणि महत्त्वाचे ध्येय समाज विकास योजनांची आहे ते म्हणजे समाजाबरोबर व्यक्तीचा विकास करणे होय कारण शेवटी व्यक्ती हीच खेडयाची व आपल्या राष्ट्राची उभारणी करत असते"

"विवक्षित भागात राहणाऱ्या एकमेकांबद्दल अवलंबन भावना असलेल्या समुदायातील लोकांच्या संभाव्य क्षमतेचा विकास घडवून आणणारी योजना म्हणजे समाज विकास योजना आहे"

कार्ल टायलर यांच्या मते, विकास योजना ही एक अशी पद्धती आहे या पद्धतीमध्ये ग्रामवासी आपली आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी मदत करण्यासाठी सहभागी होतात त्यायोगे समर्थपणे काम करणाऱ्या लोकांचा समूह बनून राष्ट्रीय विकास कार्यक्रमाला हातभार लावतात.

शासन व लोक यांच्या संघटित प्रयत्नामुळे सर्व समाजाची सांस्कृतिक आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी आणि राष्ट्रीय विकास कार्यक्रमात हातभार लावण्यासाठी एक परिवर्तनाची प्रक्रिया म्हणजे समाज विकास योजना होय.

भोई जमातीतील महिलांनी समाज विकास योजनांच्या द्वारे पारंपारिक जीवन पद्धती सोडून नवीन पुरोगामी जीवनपद्धतीचा अंगिकार करणे होय. महिलांनी या योजनेद्वारे समाजाच्या प्रेरणेने आणि महिलांच्या सहकाऱ्यांनी महिलांचेच जीवनमान उंचावणे. ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक जीवन बदलण्यासाठी आणि महिलांची जडणघडण करण्यासाठी भोई जमातीतील महिलांसाठी समाज विकास योजना अत्यंत महत्त्वाच्या आहेत. भोई जमातातील महिला समाज विकास योजनेमुळे ग्रामीण भागात राहणाऱ्या सर्व भोई समाजातील लोकांचा विकास होईल. ग्रामीण भागातील लोकांना प्रेरणा देऊन त्यांना आर्थिक मदत करून त्यांच्याकडून त्यांच्याच भागाचा विकास करणे हे महिला समाज विकास योजनांचे ध्येय आहे.

ध्येय -

1. समाज परिवर्तनासाठी योजना असावी आणि त्यात सर्व भोई जमातीतील महिलांचा सहभाग म्हणजे सामूहिक प्रयत्न असायला हवे.

2. भोई जमातीतील महिलांच्या प्रथा, रुढी, परंपरा इत्यादींचा प्रभाव असतो. त्यांच्या प्रवृत्तीमध्ये आणि सवयींत बदल करून आणणे आवश्यक आहे.

3. समाज विकास योजनेद्वारे सामाजिक प्रश्न सोडविता येतील.

4. समाज विकास योजनेंद्वारे समाजाचा पोषक अशा गुणांचा विकास करणे. सामूहिक प्रयत्न स्वंयप्रेरणा, सहयोग, स्वावलंबन, सामाजिक जबाबदारी, नेतृत्व, विश्वास, शिक्षण क्षमता इत्यादी गुणांचा विकास होणे आवश्यक आहे.

5. भोई जमातीतील महिलांचे व्यवसाय कौशल्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण, कार्यशाळा इत्यादी साधनांचा वापर करावा जेणेकरून भोई जमातीतील महिलांचे सशक्तीकरण होईल.

6. ग्रामीण भागातील आर्थिक सामाजिक सांस्कृतिक मानसिक परिवर्तन घडवून आणणे. तसेच वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग करून शेती, शिक्षण, वाहतूक, मनोरंजन, आरोग्य इत्यादी सुधारणा करता येईल.

वसंतराव नाईक विमुक्त आर्थिक विकास महामंडळ :

पिढयानपिढया भटंकती करणाऱ्या समाजाच्या आर्थिक सामाजिक व शौक्षणिक असा सर्वांगीण विकास करण्यासाठी शासनाने त्याच्या बंजारा समाजातील हरितक्रांतीचे प्रणेते कै वसंतराव नाईक यांच्या नावाने सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागांतर्गत भटक्या जाती व विमुक्त जमातीच्या विकासासाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती व

भटक्या जमाती विकास महामंडळाची स्थापना 8 फेब्रु 1984 साली करण्यात आली. शासनाने महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल 200.00 कोटी मंजूर करून दिले. त्यापौकी रु 161.29 कोटी भाग भांडवल विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विकासाकरिता उपलब्ध करून दिले.

राष्ट्रीय मागास वित्तीय विकास योजना:

बीज भांडवल कर्ज योजना:

बीज भांडवल कर्ज योजनेमध्ये 500,000 लाख रु प्रकल्प मर्यादेच्या 25% रक्कम बीज भांडवल रूपाने, नाममात्र 4% व्याज दराने 25% रक्कम महामंडळाकडून दिली जाते. आणि 75% रक्कम राष्ट्रीयकृत बँकेकडून दिली जाते. महामंडळाचे कर्ज 60 हफ्त्यामध्ये बँकेसोबत वसूल केले जाते. यामध्ये विविध व्यवसाय जसे किराणा दुकान, कापड दुकान, दुग्ध व्यवसाय, शेळी मेंढी पालन, डॉक्टर वकील कृषी व्यवसाय इत्यादी साठी कर्ज उपलब्ध करून दिले आहे.

थेट कर्ज योजना :

या योजने अंतर्गत छोटया व्यवसायाकरिता रु 25000/- महामंडळाकडून कर्ज दिले जाते. यामध्ये कर्ज वसुलीचा तीन वर्षाचा कालावधी असतो. 2% व्याजाने वार्षिक व्याज दर आकाराला जातो. वरीलप्रमाणे राज्य शासनाच्या दोन योजनेमध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीचा विकासासाठी महामंडळ अग्रेसर आहे.

मनी कर्ज योजना:

या कर्ज योजनेची प्रकल्प मर्यादा रु 10 लाख असून त्यामध्ये राष्ट्रीय महामंडळाचा 40% सहभाग, बँकेचा 50% सहभाग, महामंडळाचा 5% सहभाग आणि लाभार्थी चा 5% सहभाग असून 6% व्याज दराने कर्ज दिले जाते.

शौक्षणिक कर्ज योजना :

या मध्ये कर्ज योजनेची प्रकल्प मर्यादा रु 5 लाख असून प्रतिवर्ष रु 1.25 लाख याप्रमाणे कर्ज योजना आहे. या योजने अंतर्गत उच्च शिक्षणाकरिता तसेच वौद्यकीय शिक्षणासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. यामध्ये 4% व्याजदराने कर्ज दिले जाते.

सक्षम कर्ज योजना:

या योजनेची प्रकल्प रु 10.00 लक्ष असून यामध्ये राष्ट्रीय महामंडळाचा सहभाग 85% आहे. तर महामंडळाचा सहभाग 5% असून व्याजदर रु 5.00 लाखापर्यंत 6% व त्यावरील कर्ज करिता 8% व्याजदर आहे. कर्ज परतफेडीचा कालावधी 5 वर्ष आहे.

शिल्प संपंदा कर्ज योजना:

या योजनेची प्रकल्प मर्यादा रु.10.00 लाख असून यामध्ये राष्ट्रीय महामंडळाचा सहभाग 85%आहे, तर महामंडळाचा सहभाग 5% असून व्याजदर रु 5.00 लाखापर्यंत 6% व त्यावरील कर्जाकरिता 8% आहे. कर्ज परत फेडीचा कालावधी 5 वर्ष आहे.

स्वर्णिमा योजना :

या कर्ज योजनेची प्रकल्प मर्यादा रु 75000/- आहे. या योजनेमध्ये महिलांना विशेष प्राधान्य देण्यात येते. त्यामध्ये राष्ट्रीय महामंडळाचा 95% सहभाग व महामंडळाचा 5% सहभाग आहे. यात 5% व्याज दराने कर्ज दिले जाते.

ग्रामीण योजना

स्वाधार योजना : ज्या विद्याथ्र्यांना वसतिगृहात प्रवेश मिळत नाही अथवा प्रवेश घेतला नाही अशा मागासवर्गीय विद्याथ्र्यांसाठी स्वाधार योजना ही नव्याने सुरु करण्यात आले आहे. यामध्ये विध्यार्थायांच्या शौक्षणिक खर्चाची पूर्तता केली जाते. इयत्ता 11 वि, पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेणाज्या विद्याथ्र्यांसाठी ही योजना आहे. अशा मुलांना मुंबई, पुणे आणि नागपूर अशा शहरामध्ये वार्षिक खर्चासाठी 48000 ते 60000 रुपये अनुदान देण्यात येते. अपंगांच्या खाजगी 123 विशेष निवासी व अनिवासी शाळा आणि कार्याशाळाना अनुदान तत्वावर मंजुरी देण्यात आली आहे. नोकरी आणि शिक्षणासाठी जात पडताळणी आवश्यक आहे. त्याची प्रक्रिया जलद होण्यासाठी प्रत्येक

जिल्ह्यात जात पडताळणी समिती स्थापन केली आहे. सन 2017-2018 साठी 25000 विद्यार्थांसाठी निवड करण्यात आली.

प्रधानमंत्री मुद्रा योजना : स्टँड अप योजनेचाच मुद्रा हा एक भाग आहे. मुद्रा हे एक कार्यकारी मंडळ आहे. लघुविकास घटक आणि पुन: वित्तपुरवठा हा या मंडळाचा मुल उद्देश्य आहे. देशाअंतर्गत लहान उद्योग घटकांना वित्तपुरवठा करणाज्या आर्थिक संस्थाना वित्त सहाय्य करणे हा मुद्रा योजनेचा उद्देश्य आहे.

राजीव गांधी आवास योजना: या योजनेअंतर्गत शहरी लोकांना घरे बांधून देण्यात येतात ही योजना 2 जून 2017 पासून सुरू झाली शहरी लोकांना 2017 पासून राजीव आवास योजना सर्वांसाठी घरकुल मिळवून देणे आवश्यक आहे. बाराव्या पंचवार्षिक योजनेत झोपडपट्टी मुक्त करणे ही योजना एक लाख लोकसंख्या असलेल्या शहरांना लागू आहे.

स्टार्ट अप मेक इन इंडिया स्कीम: औद्योगिक व व्यावसायिक संचलित रोजगार वाढवण्यासाठी 2015-16 मध्ये अर्थमंत्री अरुण जेटली यांनी हा आयोग नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली कौशल्य विकास योजनेचा चा आरंभ केला. या कार्यक्रमाचा भाग म्हणून केंद्र व राज्य शासनाच्या प्रयत्नाने 1000 कोटींची तरतूद केली आहे. हा निधी 4 वर्षात खर्च केला जाणार आहे. ही कृती योजना असून उदयोन्मुख व्यावसायिकांसाठी हा निधीची तरतूद आहे. SIDBI द्वारा या निधीचे वाटप होईल. यामुळे देशातील नवतरुणांना यामुळे प्रोत्साहन मिळेल. भारत सरकारने या योजनेच्या अंतर्गत उद्योग वाढवण्यासाठी उत्तेजन दिले आहे. ही योजना 2016 मध्ये झाली अजून एक नवीन उद्योगधंद्यांना चालना मिळाली आहे यामध्ये चार आठवडयाचे मुक्त ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम घेतला जातो. योजने अंतर्गत योगाचे शिक्षण घेणाज्यांचे नेटवर्क तयार करून रीसर्च वर्क इन्क्युबेटर करण्यासाठी सेंटर स्थापित करण्यात आले

घरकुल योजना:. निवारा एक मूलभूत गरज आहे . तसेच अर्थव्यवस्थेचा भाग पण आहे 2011 च्या जनगणनेनुसार शहरी लोकसंख्या 3377 लक्ष पर्यंत पोहोचली आहे. प्रती घरकुल रु 100000 किमतीपौकी लाभार्थी हिस्सा रु 10000 रोख अथवा बांधकाम साहित्य वा मंजुरीच्या स्वरुपात देणे बंधनकारक आहे.

आदिवासी विकास योजना -1983 साली आदिवासी विकास विभाग स्थापन झाला. 15 जानेवारी 1992 रोजी पुनर्रचना आदिवासी विभाग केंद्र व राज्य शासनातर्फे विविध योजना राबवण्यात आल्या. शौक्षणिक विकास योजना समाजातील निरक्षरतेचे प्रमाण कमी करून साक्षरतेचे प्रमाण वाढवण्यासाठी तसेच शिक्षणाच्या विविध सुविधा देण्यासाठी वस्तीगृह, मोफत शिक्षण योजना राबवण्यात आल्या. शासकीय आश्रम शाळेत 5 ते 7 हजार विद्यार्थांसाठी सुविधा उपलब्ध करून दिले आहेत.

प्रधान मंत्री मुद्रा योजना : शासनाने या योजनेत संपत्ती अथवा ग्ॉरण्टर शिवाय छोटया उद्योगांचे कर्ज माफ केले आहेत. 75 % महिलांना कर्ज दिले आहेत. 9.81% उद्योग उद्योगात महिलांना फायदा झाला. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार 47 कोटी स्वंय सहाय्यता बचत गटाला महत्त्व आले. दोन हजार 2000 करोड पेक्षा जास्त फंड विरहित कर्जात 37% नी वाढ दिसून आली.

विमा योजना : 2013 या योजने अंतर्गत दोन लाख इत्यादी विमा योजनेवर प्रीमियम नाही. त्याचा खर्च शासन करतो. याचा सर्व 14 लाख महिलांना लाभ झाला आहे.

सारांश :

भोई जमातीतील महिलांसाठी कागदोपत्री अनेक योजना असल्या तरी या योजना या घटकांपर्यंत पोहचल्या नाहीत. त्या कारणामुळे भोई जमातीतील महिलांचे अपेक्षित असे सशक्तीकरण झाले नसल्याचे दिसून येते. विमुक्त व भटक्या भोई व तत्सम लोकांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी ज्या योजना आहेत त्यामुळे आर्थिक प्रश्न सुटतील असे वाटत नाही. लाभार्थी या योजनेचा वापर दैनंदिन कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी करतात हा अनुभव आहे. त्यामुळे या समाजासाठी भरीव व कृतीशील कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे.

मध्यवर्ती सरकारच्या इतर मागासवर्गीय यादीत विमुक्त व भटक्याचा समावेश आहे. परंतु विमुक्त व भटके इतर मागासवर्गीय पातळीवर नाहीत. आर्थिक, सामाजिक, राजकीय व शौक्षणिकदृष्टया मागासवर्गीय (ओबीसी) पुढारलेले आहेत. त्यामुळे सवलतीचा फायदा मध्यवर्ती सरकारच्या योजनामध्ये भटक्यांना मिळण्याची शक्यता नगण्य असते. त्यामुळे या योजना या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचत नाहीत.

मध्यवर्ती सरकारच्या यादीत भटक्या भोई समाजातील महिलांसाठी विशेष तरतूद केल्यास महिलांचे सशक्तीकरण प्रभावीपणे होईल.

संदर्भ :


1. ग्रामीण समाजशास्त्र, गुरुनाथ नाडगोंडे कॉनटीनेंटल प्रकाशन, पुणे 1976

2. योजना महिला सक्षमीकरण oct 2018 अंक 3, पृ.21

3. पद्मासेठ, स्त्रीयाआणिसामाजिकविकासयोजना 8 फेब्रुवारी 1995, पृ.9

4. जाती जमाती - रामनाथ चव्हाण (1989) मेहता पब्लिकेशन हाउस, पुणे

5. भारतीय समाज मे स्त्रियो कि परिस्थती, राष्ट्रीय रिपोर्ट, 1971-74 आलाईड पब्लिकेशन.

6. www.mr.vikaspedia.in

7. Devendra Kiran whose empowerment are we talking of:women! But where will we find our Girls.

8. मराठी लोकांची संस्कृती - इरावती कर्वे, रा.ज. देशमुख अँड देशमुख कं.

9. shodhganga.infibnet.nc.in